आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२३ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना आणि मनसेची प्रत्येकी ४५ उमेदवारांची तर राष्ट्रवादी काँग्रेसची ३८ उमेदवारांची यादी जाहीर/ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोपरी पाचपाखाडीतून तर उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीमधून निवडणूक लढवणार

- रशिया दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार / ब्रिक्सच्या सत्रातही आज प्रधानमंत्र्याचं भाषण

- भारत ब्रँड हरभरा डाळीची दुसऱ्या टप्प्यातली विक्री राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघाच्या माध्यमातून सुरु

**आणि**

- चालू आर्थिक वर्षात भारतासाठी ७ टक्के जीडीपी वृद्धीदराचा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ताज्या अहवालात कायम

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठीच्या राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या वाटाघाटी शेवटच्या टप्प्यात असून चित्र लवकरच स्पष्ट होण्याची चिन्हं आहेत.

**राष्ट्रवादी काँग्रेस** पक्षानं ३८ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे अध्यक्ष अजित पवार बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. छगन भुजबळ येवल्यातून, दिलीप वळसे पाटील आंबेगाव इथून, हसन मुश्रीफ कागलमधून, तर धनंजय मुंडे परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. विधानसभेचे उपाध्यक्ष

नरहरी झिरवाळ यांना दिंडोरीतून, धर्मराव आत्राम यांना अहेरीतून, तर अदिती तटकरे यांना श्रीवर्धन इथून राष्ट्रवादीनं उमेदवारी जाहीर केली आहे.

**शिवसेनेनं** काल ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा एकदा कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. मंत्री अब्दुल सत्तार सिल्लोडमधून, उदय सामंत रत्नागिरीतून, तर दीपक केसरकर सावंतवाडीतून निवडणूक लढवणार आहेत. सुहास कांदे यांना नांदगाव विधानसभा मतदारसंघातून, प्रताप सरनाईक यांना ओवळा-माजीवड्यातून, तर दादाजी भुसे यांना मालेगाव बाह्य मतदारसंघातून शिवसेनेनं उमेदवारी दिली आहे.

दरम्यान, **महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही** ४५ उमेदवारांची दुसरी यादी काल प्रसिद्ध केली. पक्षाचे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहिममधून मनसेनं उमेदवारी दिली आहे. त्यांच्यासमोर विद्यमान आमदार आणि शिवसेनेचे नेते सदा सरवणकर यांचं आव्हान असणार आहे. महाविकास आघाडीचा भाग असलेल्या **शेतकरी कामगार पक्षानंही** काल, अलिबाग, पनवेल, उरण, पेण आणि सांगोला या पाच जागांवर उमेदवारांची घोषणा केली. **भारतीय कम्युनिस्ट पक्षानं** शीव-कोळीवाडा मतदारसंघातून विजय दळवी यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला कालपासून सुरुवात झाली आहे. बीड जिल्ह्यातल्या आष्टी विधानसभा मतदारसंघासाठी आज माजी आमदार भीमराव धोंडे यांनी अपक्ष अर्ज दाखल केला.

कालच्या पहिल्या दिवशी, राज्यातून ५७ उमेदवारांचे ५८ अर्ज दाखल झाल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. **बीड** जिल्ह्यात काल ४८३ अर्जाची विक्री झाली तर तीन अपक्ष उमेदवारांचे अर्ज दाखल झाले. **हिंगोली**

जिल्ह्यातल्या तीनही विधानसभा मतदारसंघात काल १५३ उमेदवारी अर्जाची विक्री झाली. मात्र,  एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही. **वसमत** विधानसभा मतदारसंघात ४३ अर्ज विकले गेले. **कळमनुरी** विधानसभा मतदारसंघात ४४ अर्ज विकत घेण्यात आले तर **हिंगोली** विधानसभा मतदारसंघात  ६६  उमेदवारी अर्ज विकले गेले.

**गोंदिया** जिल्ह्यात काल एकुण ७९ अर्जांची विक्री झाली. अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रामध्ये  २५ अर्जांची उचल करण्यात आली तर तिरोडा  मध्ये २३, गोंदिया मध्ये १६ आणि  आमगाव मध्ये १५ अर्ज विकले गेले.  इथेही  एकादेखील उमेदवारानं  नामनिर्देशनपत्र दाखल केलेलं  नाही. सोलापूर जिल्ह्यातल्या ११ मतदारसंघात ४०८ अर्जांची विक्री झाली.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैधरित्या उत्पादित होणाऱ्या, अवैध मार्गाने राज्यात येणाऱ्या दारूवर कारवाई करण्यात येणार असल्याचं राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी यांनी सांगितलं. नांदेड परिक्षेत्रातल्या उत्पादन शुल्क विभागाच्या कामकाजाचा आढावा सूर्यवंशी यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नांदेड परिक्षेत्राच्या पोलीस उप निरीक्षकांनी मागच्या दोन महिन्यात दारुबंदी संदर्भात केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तसंच कर्नाटक आणि तेलंगणा राज्याची सीमा असलेल्या भागात तपासनाके उभारल्याचं सांगितलं.

**<><><><><>**

लातूर जिल्हा प्रशासनातर्फे आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी सुरू आहे. या अंतर्गत लातूर पोलिसांनी औसा तालुक्यात एकावर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल केला असून १५ जणांवर अवैध शस्त्रास्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हे दाखल

केले आहेत. फेक स्पीच; तसंच समाज माध्यमावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणीही पाच गुन्हे दाखल झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं धुळे जिल्हा पोलिस दलानं  धुळे जिल्ह्यात विशेष मोहिम राबवून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ६ पिस्तुलं, ८ जिवंत काडतुसं, १६ तलवारी, १ कोयता, गुप्ती अशी घातक शस्त्रे याच्यासह विदेशी, देशी मद्यसाठा, अंमली पदार्थ, गांजा, गुटखा मोठ्या प्रमाणात जप्त केले आहेत. पोलिसांनी १७ फरार आरोपींना अटक केली असून २४ लाखांचा बेकायदेशीर मद्यसाठा देखील जप्त करण्यात आला आहे. ही  माहिती धुळे जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी आज दिली.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात **आज पालघर** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

ब्रिक्स परिषदेच्या निमित्ताने रशियातल्या कझान इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरल्या गस्तीच्या व्यवस्थेसंबंधी दोन्ही देशांमध्ये झालेल्या कराराच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा होणार आहे. गेल्या पाच वर्षांत प्रधानमंत्री मोदी आणि राष्ट्राध्यक्ष जिनपिंग यांच्यात औपचारिक बैठक झाली नव्हती.

भारत आणि चीन यांच्यात सीमेवरच्या गस्तीसंबंधाने झालेल्या करारानंतर या देशांमधले संबंध सामान्य होतील, अशी आशा संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी व्यक्त केली आहे. गुटेरेस ब्रिक्स परिषदेलाही उपस्थित राहणार आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ब्रिक्स सत्रालाही संबोधित करणार आहेत. प्रधानमंत्र्यांनी काल रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसौद पेजेश्कियान यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा केली. रशिया- युक्रेन तसंच पश्चिमआशियात सुरु असलेल्या संघर्षांवर शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढला जावा, असं प्रधानमंत्र्यांनी यावेळी म्हटलं. तसंच यात भारत सहकार्य करेल, असं आश्वासन दिलं. हा संघर्ष निवळण्यासाठी संवादाची गरज त्यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ आणि नाफेडच्या माध्यमातून भारत ब्रँड हरभरा डाळीची दुसऱ्या टप्प्यातली विक्री केंद्र सरकारनं आज नवी दिल्लीत सुरू केली. भारत चणा डाळ ७० रुपये किलो आणि चणा ५८ रुपये किलो दरानं उपलब्ध होईल, अशी माहिती ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी यावेळी दिली. याशिवाय भारत मूग डाळ १०७ रुपये किलो आणि मसूर डाळ ८९ रुपये किलो दरानं मिळत आहे.

**<><><><>**

भारताचा जीडीपी वृद्धीदर या आर्थिकवर्षा अखेरीपर्यंत ७ टक्के राहील, असा अंदाज गेल्या जुलै मधे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं वर्तवला होता तो ताज्या अहवालात कायम ठेवला आहे. त्यानंतरच्या आर्थिकवर्षात म्हणजे २०२५-२६मधे भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ साडेसहा टक्के दरानं होईल, असं अहवालात म्हटलं आहे. चालू वर्षात अमेरिकेचा वृद्धीदर दोन पूर्णांक सहा दशांशटक्के राहील, असा

अंदाज नाणेनिधीनं गेल्या जुलैमधे व्यक्त केला होता. तो बदलून आता २ पूर्णांक ८ दशांश टक्के राहील, असं अहवालात म्हटलं आहे. चीनचा वृद्धीदर ५ टक्के राहील, असा अंदाज होता, तो कमी करुन ४ पूर्णांक ८ दशांश टक्के राहील, तर जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर यंदा आणि पुढच्या वर्षीदेखील ३ पूर्णांक २ दशांश टक्के राहील, असा अंदाज आहे. या अहवालात १९० देशांच्या अर्थव्यवस्थांचा अभ्यास करुन सर्वत्र चलनवाढीबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. मात्र वाढती कर्ज, व्यापारातली वाढती अनिश्चितता, आणि भूराजकीय संघर्षाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. विशेषतः पश्चिम आशियातल्या तणावामुळे या प्रदेशातला व्यापार बसण्याची आणि महागाई भडकण्याची शक्यता नाणेनिधीनं वर्तवली आहे.

**<><><><>**

भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर इथं आज आयोजित केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावरील एक दिवसीय परिषदेचं उद्घाटन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते दूरस्थ पध्दतीनं झालं. यावेळी विविध विद्यापीठांचे कुलगुरू, प्राचार्य तसचं शिक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक मान्यवर उपस्थित होते.

**<><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना उद्या पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर भारतीय वेळेनुसार सकाळी साडेनऊ वाजता सुरू होणार आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाला बंगळुरू इथं पहिल्या कसोटीत पराभव स्वीकारावा लागला असल्यानं हा सामना जिंकण्यासाठी भारतीय संघ निकराचे प्रयत्न करेल.

**//<><><><>//**